क्रमांक: पोअय/वाचक/प्रेस नोट/२०२४ -
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :

# प्रेस नोट

दिनांक - १९/०२/२०२५

## 'यवतमाळ पोलिसांनी फरार नक्षली नेता तुलसी उर्फ दिलीप महतो घेतला ताब्यात'

यवतमाळ पोलिसांनी झारखंडमध्ये अनेक गंभीर गुन्हे करून फरार असलेल्या नक्षली नेत्याला तुलसी उर्फ दिलीप महतो यास यशस्वीरित्या ताब्यात घेतला आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई यशस्वीपणे पार पडली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

### गोपनिय माहिती आणि निरीक्षण

मिळालेल्या विश्वसनिय व गुप्त माहितीनुसार, तुलसी उर्फ दिलीप महतो हा झारखंडमधून पळून यवतमाळ जिल्ह्यात लपल्याची माहिती मिळाली होती. सदरची माहिती तातडीने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांना कळवण्यात आली. त्याअनुषंगाने त्यांनी अचूक विश्वसनिय व गोपनिय यंत्रणेच्या मदतीने आरोपीचा मागोवा घेण्याचे आदेश दिले.

पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यांना संशयितावर गुप्तपणे नजर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान व स्थानिक सूत्रांच्या मदतीने आरोपीला पांढरकवडा, उमरी येथील एका स्टोन क्रशर परिसरात असल्याची माहीती मिळाली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवुन एक विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले.

### कारवाईत सहभागी पोलीस पथक

१) पोलीस निरीक्षक सतीष चवरे, स्थानिक गुन्हे शाखा,
२) पोउपनि. गजानन राजमल्लू
३) सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक साजिद नाईक
४) पोलीस हवालदार रुपेश पाली
५) पोलीस शिपाई रवी नेवारे
६) पोलीस शिपाई राज कांबळे

## आरोपीचा ताबा

संशयिताच्या लपण्याच्या ठिकाणी छापा टाकण्याची काटेकोर योजना आखून अंमलबजावणी करण्यात आली व संशयीत इसमास घेराव घालण्यात आला. संशयिताने बनावट आधारकार्ड सादर करून खोटी ओळख देवुन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या संशयास्पद वर्तणुकीमुळे त्याला तात्काळ ताब्यात घेण्यात आले. संशयीताकडे कठोर चौकशी केल्यानंतर, आरोपीने स्वतःची खरी ओळख आणि नक्षलवादी कारवायांमधील सहभाग असल्याचा मान्य केला.

## नक्षली नेत्याची माहिती

**नावः** तुलसी उर्फ दिलीप जेठू महतो वयः ४७ वर्षे

**नक्षलवादी कारकीर्दः** 1993 मध्ये झारखंडमधील नक्षली गटात भरती झाला.

**पदोनतीः** 1997 मध्ये 'भितीया दलम' चा विभागीय कमांडर म्हणून नियुक्ती व १२ सशस्त्र नक्षलवाद्यांचे नेतृत्व मिळाले.

**गुन्हेगारी कारवाया** : सुरक्षा दलांवर हल्ले, खंडणी, सरकारी मालमत्तेची तोडफोड अशा अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभाग.

## तुलसी / दिलीप महतो याच्यावरील गुन्हे

**झारखंड पोलिसांच्या नोंदींनुसार, तुलसी उर्फ दिलीप जेठू महतो हा किमान सात गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील आहेः**

१) पोलीस ठाणे मंडू अप क्र.. २२४ / १९९९ कलम ३०७, ३५३, ४३५, ४४० भादवि. सह कलम २७ शस्त्र अधिनियम आणि ३/४ स्फोटक पदार्थ अधिनियम.

२) पोलीस ठाणे विष्णुगड अप.क्र. ६/ १९९८ कलम ३७९ , ४११, १२०(ब) भादवि, सह कलम ३०(ii) कोळसा खाण अधिनियम आणि सह कलम ३३ भारतीय वन अधि.

३) पोलीस ठाणे सदर अप क्र. १७/९८ कलम ३७९, ४११ भादवि. कलम ३०(ii) कोळसा खाण अधिनियम आणि कलम ३३ भारतीय वन अधिनियम.

४) पोलीस ठाणे चौपराण अप क्र. १/९८ कलम ३७९, ४११, १२०(ब), ४१४ भादवि, कलम ३०(ii) कोळसा खाण अधिनियम.

५) पोलीस ठाणे चर्चू अप क्र. १/९९ कलम २१६ भादवि सह कलम १७ सीएलए ॲक्ट

६) पोलीस ठाणे चर्चू अप क्र. ३/९९ कलम ३०२, २०१, १२०(ब), ३४ भादवि.

**झारखंड पोलिसांशी समन्वय**

आरोपीच्या कबुलीजबाबाची आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीची पुष्टी करण्यासाठी, यवतमाळ पोलिसांनी झारखंड पोलिसांशी तात्काळ समन्वय साधला. पोलीस अधीक्षक हजारीबाग आणि ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अंगो यांचेकडुन तुलसी उर्फ दिलीप महतो याचे ओळखीची आणि गुन्हेगारी इतिहासाची पडताळणी करण्यात आली.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भापोसे) आणि अपर पोलीस अधीक्षक पियूष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि. गजानन राजमलु, पोलीस अंमलदार सैयद साजीद, बंडु डांगे, रवि नेवारे, रुपेश पाली, योगेश डगवार, आकाश सुर्यवंशी, राजकुमार कांबळे, देवेंद्र होले, योगेश टेकाम, धनंजय श्रिरामे, महेश वाकोडे या पोलीस पथकाने महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

(कुमार चिंता भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ